पत्र

अेईएक्स(१)/जैवीक शेती मिशन/मकृसे गट-अ/ प्र.क्र.७१/आस्था-१/12006
कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे
दिनांक :-20/११/२०१८

प्रति,

विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)
जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)

विषय :- विषय :- सेंद्रिय शेती/ विषमुक्त शेतीची राज्य पुरस्कृत योजनेंतर्गत डॉ.पंजाबराव देशमुख जैवीक शेती मिशन राबविणेबाबत.

संदर्भ :- १) शासन निर्णय क्रमांक जैशेमि २०१८/प्र.क्र.१२५/१७-अे दि. १६/१०/२०१८
२) जा.संचा.आत्मा/जै.शे.जि/प्र.व्य.यु.पदे/९६५/२०१८ दि. १९/१०/२०१८

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये सेंद्रिय शेती/ विषमुक्त शेतीची राज्य पुरस्कृत योजनेंतर्गत डॉ.पंजाबराव देशमुख जैवीक शेती मिशन राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

सदरचे मिशन मुख्यालय अकोला येथे राहणार असून प्रकल्प व्यवस्थापन युनिटची संरचना खालील प्रमाणे असेल.

१. प्रकल्प संचालक : सहसंचालक (कृषि) (प्रतिनियुक्तीने) / अधिक्षक कृषि अधिकारी (प्रतिनियुक्तीने) अधिक्षक कृषि अधिकारी यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती झाल्यास सहसंचालक (कृषि ) यांची वेतन श्रेणी अनुज्ञेय राहील.
२. कृषि उपसंचालक : कृषि विभागातून प्रतिनियुक्तीने

त्यानुषंगाने आपल्या अधिनस्त असलेले प्रकल्प संचालक पदाकरीता सहसंचालक (कृषि)/ अधिक्षक कृषि अधिकारी संवर्गातील अधिकारी व कृषि उपसचालक पदाकरीता उपसंचालक संवर्गातील जे अधिकारी डॉ.पंजाबराव देशमुख जैवीक शेती मिशन अकोला येथे प्रतिनियुक्तीने जाण्यास इच्छुक असतील, त्यांनी सदर पदासाठीचा विकल्प कृषि आयुक्तालयाच्या esttcl1@gmail.com या मेल आयडीवर दि.७/ १२/२०१८ पर्यंत सादर करावेत, तद्नंतर प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

(एन.टी.शिसोदे)
**कृषि सहसंचालक (आस्थापना)**
**कृषि आयुक्तालय म.रा.पुणे**

प्रत- माहिती तथा कार्यवाहीस्तव सविनय सादर
१. मा. विभागीय आयुक्त (सर्व)
२. मा. महासंचलक, वनामती, नागपूर
३. मा.संचालक (सर्व)